महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९८ वे | दिनांक : ०१/०४/२०२६ | वार : बुधवार

# राज्यात १० सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या





**मुंबई :** आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी राज्य सरकारने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल केले आहेत. १० वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS) बदल्यांचे आदेश आज (३१ मार्च) जारी करण्यात आले असून, यात अश्विनी भिडे यांची मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी झालेली नियुक्ती सर्वात महत्त्वाची मानली जात आहे. तर, आपल्या कडक शिस्तीसाठी ओळखले जाणारे तुकाराम मुंढे यांच्याकडे आता 'आपत्ती व्यवस्थापन' या महत्त्वाच्या विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

१९९५ च्या बॅचच्या सनदी अधिकारी आणि मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिव म्हणून कार्यरत असलेल्या अश्विनी भिडे यांची नियुक्ती मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी करण्यात आली आहे. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पातील त्यांच्या कामाचा अनुभव आणि प्रशासकीय पकड पाहता, मुंबईच्या विकासकामांना गती देण्यासाठी सरकारने त्यांच्यावर हा मोठा विश्वास टाकला आहे. मुंबईच्या नागरी समस्या आणि पायाभूत सुविधांच्या दृष्टीने त्यांची नियुक्ती महत्त्वाची ठरणार आहे.

२००५ च्या बॅचचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदावरून 'आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन' आणि वन विभागाच्या सचिवपदी करण्यात आली आहे. सध्या राज्यात सुरू असलेला अवकाळी पावसाचा धुमाकूळ, गारपीट आणि नैसर्गिक आपत्तींचे संकट पाहता, अत्यंत कार्यक्षम आणि धडाडीच्या अधिकाऱ्याची या पदावर गरज होती. मुंढे यांच्या अनुभवाचा फायदा राज्याला येणाऱ्या काळात होणाऱ्या नैसर्गिक आपत्तींच्या नियोजनात मिळेल, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे.

१९९३ च्या बॅचचे अधिकारी आणि 'महावितरण'चे (MSEDCL) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची नियुक्ती आता मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव म्हणून करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांच्या जागेवर आता ते मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या सचिवालयाची धुरा सांभाळतील.

विकासचंद्र रस्तोगी (१९९५): अप्पर मुख्य सचिव (कृषी) वरून आता वित्त विभागात (वित्तीय सुधारणा) अप्पर मुख्य सचिव म्हणून बदली.

विनिता वैद सिंघल (१९९६): प्रधान सचिव (आपत्ती व्यवस्थापन) वरून मृद व जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती. परिमल सिंग (२००४): 'पोकरा' प्रकल्पाचे संचालक आता कृषी विभागाचे सचिव असतील. पृथ्वीराज बी. पी. (२०१४): पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त आता वसई-विरार महापालिकेचे नवे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारतील. लाहू माळी: व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, मुंबई. प्रेरणा देशभ्रतार: राज्य कर सहआयुक्त पदावरून आता मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई पदी नियुक्ती.

## गॅस - पेट्रोल तुटवडाही नेहरूंमुळेच झाला : विजय वडेट्टीवार यांचा भाजपला खोचक टोला



**मुंबई :** राज्यातील जनता गॅस सिलिंडरसाठी तासनतास रांगेत उभी आहे. हायवेवरील हॉटेल्स बंद पडली आहेत. काँग्रेस कार्यालयाबाहेरील हॉटेल्सही ओस पडली आहेत. पण सत्ताधाऱ्यांची बनवाबनवी अजूनही सुरूच आहे, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आज केंद्र व राज्यातील भाजप सरकारवर निशाणा साधताना केली. सध्याची इंधन टंचाई पंडित जवाहरलाल नेहरू किंवा इंदिरा गांधींमुळेच झाली असेल, असा खोचक टोलाही त्यांनी यावेळी भाजपला हाणला.

इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे सध्या भारताला होणारा इंधन पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे देशात सर्वत्र इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. अनेक शहरात गॅस एजन्सीपुढे नागरिकांच्या लांबलचक रांगा लागल्याचे दिसून येत आहेत. त्यातच भाजपने या स्थितीसाठी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना जबाबदार धरल्यामुळे काँग्रेसचे पित्त खवळले आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी वरील टीका केली आहे. ते म्हणाले, हा गॅस - पेट्रोल तुडवडा पंडित नेहरूंमुळेच झाला असेल! गॅस सिलेंडरसाठी जनता तासन तास रांगेत उभी आहे, हायवेवरची हॉटेलं बंद पडली आहेत, काँग्रेस कार्यालय बाहेरील हॉटेल बंद आहेत पण सत्ताधाऱ्यांची 'बनवाबनवी' अजूनही सुरूच आहे!

स्वत:च्या चुकांचे खापर दुसऱ्यांवर फोडताना भाजपला लाज वाटत नाही..पाप तुमचं आणि खापर काँग्रेसवर? राहुल गांधीचे नाव भाजपला घ्यायचे नसेल हा तुटवडा पण पंडित नेहरू, इंदिराजी गांधी यांच्यामुळेच झाला,भाजपची ही जुनी टेप आहे. लोकांच्या चुली विझवून कसले नवीन जुमले देत आहेत?जनतेच्या संयमाचा अंत पाहू नका, उत्तरे द्या, असे वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सातारा जिल्ह्यात मंत्री शंभूराज देसाई व पोलिसांत झालेल्या कथित झटापटीवरही भाष्य केले. या घटनेला त्यांनी थेटपणे भाजपला जबाबदार धरले. ते म्हणाले, राज्याचे गृहखातं झोपलंय की जाणीवपूर्वक डोळेझाक करतंय? साताऱ्यात मंत्र्यावर हल्ला झाला. तेव्हा सीसीटीव्ही बंद होते. हा पुराव्यांची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न आहे. हा पूर्वनियोजित कट नाही तर काय? हे राज्य सुरक्षित आहे का? मंत्र्यावर हल्ला होतो, सीसीटीव्ही बंद असतात, पुरावे नष्ट केले जातात. हे सर्व कोणाच्या इशाऱ्यावर घडतंय? जनतेला उत्तर हवंय.

हे घडवायचे होते म्हणून तिथे पीओपीचे काम काढले. आणि पीओपीचे काम काढले म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे बंद पडले. ही वस्तुस्थिती आहे. ते अर्धवट सांगत आहेत. ते पुरावे सापडू नये म्हणून प्रयत्न करत आहेत. तो मंत्री (शंभूराज देसाई) अगोदरच फार बारीक किरकोळ आहे. त्याला थोडे बसले. अधिक बसले असते तर महाराष्ट्राचा मंत्री शहीद झाला असता, असे वडेट्टीवार म्हणाले.

## खरातची जागा आणि आवारेचे दुकान! : भोंदू अशोक खरात प्रकरणात सुषमा अंधारेंचा नवा गौप्यस्फोट



**पुणे :** अशोक खरात प्रकरणी अनेक नवनवीन खुलासे समोर येत आहेत. त्यात विरोधकांकडून सरकारवर दबाव निर्माण करण्याचे देखील प्रयत्न सुरू आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा नवे गौप्यस्फोट केले आहेत.

सुषमा अंधारे म्हणाल्या, दीपक केसरकर यांना सगळे माहीत आहे की अशोक खरातला कोण कोण पोसत आहे. त्यांना आव्हान आहे की या सगळ्या प्रकरणात तुम्हाला माहीत असून या सगळ्या संबंधाने माहिती देत नसाल आणि माझे नाव आले तर मी इतरांचे नावे घेईल, तर याचा अर्थ तुम्ही इतर गुन्हेगारांना लपवून ठेवत आहेत. हे कोण ३९ लोक आहेत, त्यांची नावे उघड केली पाहिजेत. केसरकर असे म्हणतात की, मी एकटा गेलो नव्हतो, माझ्यासोबत एकनाथ शिंदे होते. याचा अर्थ अशोक खरात आणि एकनाथ शिंदे यांचे संबंध आहेत, असे केसरकर सांगू इच्छितात का? असा सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

पुढे बोलताना सुधमा अंधारे म्हणाल्या, नेमके या सगळ्यात त्यांना सूचित काय करायचे आहे हे त्यांनी स्पष्ट केले पाहिजे. आम्ही एसआयटीला भेटून सांगितले होते की, शिवनिकाची सर्व सदस्यांची चौकशी झाली पाहिजे. यात प्रामुख्याने ३ नावे आहेत. ज्यात एक नाव आहे चाकणकर, नामकर्ण आवारे आणि ललित पोफळे. नामकरण आवारे ही महत्त्वाची कडी आहे. ती का महत्त्वाची आहे त्याचे कारण म्हणजे आवारे हा भाजप उद्योजक आघाडीचा सरचिटणीस आहे. पण सध्या त्याचे भाजपसोबत कनेक्शन दिसत नाही.

सुधमा अंधारे म्हणाल्या, कॅप्टन खरात हा जगदंब पथसंस्थेचा २०१८ ते २०२४ या काळात चेअरपर्सन होता. या पथसंस्थेचा सर्वेसर्वा हा आवारे आहे. पुढे तीन अपत्य असल्याने सहकारी संस्थेचा चेअरपर्सन होता येत नाही असे म्हणत चेअरमनशिप काढण्यात आली होती. १५ वर्षापासून हा जो आवारे आहे शिवनिका संस्थेवर संचालक होता. म्हणजे शिवनिका ट्रस्टवर आवारे आणि आवारेच्या बँकेवर खरात, या दोघात आर्थिक हितसंबंध आहेत. आता हे दोघे वेगळे झाले असले तरी खरातची भोंदुगिरी वाढवण्याचे कॅम्पेन आवारेनेच केले होते. आवारे हा त्या काळात स्टाइसचा मेंबर होता. स्टाइस म्हणजे सिन्नर तालुका औद्योगिक वसाहत संस्था. या संस्थेत जे ४०० उद्योजक आहेत, त्या ४०० पैकी १२ उद्योजकांची मिळून एक संचालक कार्यकारिणी बनते. या १२ पैकी एक खरात होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ मार्च २०२६


## श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळास उत्कृष्ट शिक्षण संस्था पुरस्कार




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** देशातील अग्रगण्य व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या नवभारत टाईम्स, दिल्ली या वृत्तसंस्थेतर्फे दिला जाणारा उत्कृष्ट शिक्षण संस्था पुरस्कार आपल्या उमरगा येथील श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेला आज छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे प्रदान करण्यात आला. हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे अक्षय ऊर्जा व दुग्धविकास मंत्री मा. ना. अतुलजी सावे व आमदार श्री. विक्रमजी काळे यांच्या हस्ते श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मा. श्री. रामकृष्णपंत खरोसेकर यांना भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. यावेळी आदर्श वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. श्री. राम सोलनकर, श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य श्री. राम पेठकर व तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. १० सप्टेंबर १९८४ रोजी स्थापन झालेल्या या संस्थेने अत्यंत उल्लेखनीय व गौरवास्पद कामगिरी केलेली आहे. या पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्यावर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विनायकराव पाटील व सरचिटणीस, माजी मंत्री मा. श्री. बसवराज पाटील यांनी प्राचार्य तसेच सर्व कर्मचारी वर्गाचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

## महिला व बालकांच्या पोषणात लक्षणीय सुधारणेचे उदिष्ट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यातील कुपोषणाच्या समस्येवर मात करुन महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन (CIFF) यांच्यात महिला व बालकांच्या पोषणा संदर्भात पाच वर्षांसाठी सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असून, या भागीदारीमुळे माता व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे.योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी मोहीमप्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMV) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये यासंदर्भातील अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे.तसेच, सीआयएफएफ कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या 1000 दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक साहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाइम निरीक्षण, डेटाआधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे.या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार असल्याची माहिती महिला व बालविकास विभागामार्फत देण्यात आली आहे.

## कालिकादेवीमध्ये स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर यांची जयंती उत्साहात साजरी




**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या तथा आदर्श शिक्षण संस्था,नवगण शिक्षण संस्था,अनंत कृषी प्रतिष्ठान व विनायक युवक कल्याण शिक्षण संस्थेच्या संस्थापिका,माजी खासदार.स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते काकूंच्या व नानांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी आपल्या भाषणातून विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून स्वर्गीय केशरबाई (काकू)क्षीरसागर यांच्या कर्तुत्वाची माहिती सांगताना म्हणाले की,काकूंनी प्रथम कर्णाटक राज्यात विजापूरला शिक्षिकेची नोकरी केली.त्यानंतर बीड जिल्ह्यातील राजुरी(न.)या आपल्या गावी पहिल्या महिला सरपंच,सभापती,आमदार आणि तीन वेळा खासदार असा राजकीय प्रवास करताना त्यांनी बीड जिल्ह्यामध्ये शिक्षण,सहकार या क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडून आणला.विविध शिक्षण संस्थांच्या माध्यमातून वाडी, वस्त्या,तांडे,गाव,तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षणाचे रोपटे लावून त्याचे वटवृक्षामध्ये रूपांतर केले.यामुळे ग्रामीण भागातल्या अनेक गरजूंना शिक्षण घेता आले.अनेकांना नोकरी मिळाली.जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठीचा आराखडा तयार करून त्याचा दिल्ली दरबारी सतत पाठपुरवठा केला.तसेच बीड जिल्ह्याच्या रेल्वेचे स्वप्न साकार व्हावे म्हणून सर्वतोपरी प्रयत्न केले.आज काकूंच्या अथक प्रयत्नांमुळेच बीड वाशीयांचे रेल्वेचे स्वप्न साकार झाल्याचे आपण पाहतो आहोत.तद्वतच काकूंना गोर-गरीब व कष्टकरी समाजातील लोकांविषयी अतिशय तळमळ होती.त्यांच्यामुळे अनेक लोकांना नोकरी,रोजगार उपलब्ध झाला.काकूंनां सर्वसामान्य माणसांच्या सुधारणेबद्दल अतिशय तळमळ होती.आपल्या बीड जिल्ह्यावर त्यांचे अनंत उपकार आहेत.हे आपण कधीच विसरू शकत नाहीत.अशाप्रकारे काकूंच्या विविध कार्यावर प्रकाश टाकला.त्यानंतर प्रा.बसवेश्वर देशमाने,प्रा.महारुद्र डोंगरे यांनीही जयंतीच्या निमित्ताने मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी शासकीय निवासी शाळेचे मुख्याध्यापक संतोष सानप,प्राचार्य बी.आर. जायभाये, प्राचार्य महादेव डोंगर,उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे,प्रा.संजय आव्हाड, प्रा.नामदेव तरकसे, प्रा.अशोक इनकर,प्रा.नारायण घोलप, प्रा.अनिल जरे,प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.बिभीषण घायाळ, प्रा.महादेव हांगे,प्रा.नारायण तांबे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.घनश्याम चव्हाण,डॉ.अशोक घोडके, डॉ.सत्यनारायण ढवळे,प्रा.सुनील मोरे,प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.अशोक सवासे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.अक्षय रणखांब,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सविता दराडे,सौ. अनिता लाटे,रवींद्र बडे,वसंत आहेर, आप्पासाहेब कांबळे,प्रकाश राऊत,बाळासाहेब येवले,जयेंद्र निकम,नितीन बहिर,रोहित शिराळे,रवींद्र शिंदे,आदिनाथ काशिद,सुनील खेडकर,विलास कांबळे,गौतम भौसले,या सर्वांनी स्व.काकूंच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद गलांडे यांनी केले.यावेळी सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.


## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ मार्च २०२६


## सेवापूर्ती सोहळयात राजू ढगे यांचा गौरव; सामाजिक कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** काकांनी ज्या उद्देशाने शैक्षणिक संस्था उभी केली. त्या हेतूनेच वरिष्ठ महाविद्यालयात चांगली माणसे नियुक्त केली. ती गुणात्मक, दर्जात्मक, चांगल्या विचारांची राहावीत, या भूमिकेतूनच चांगली माणसे निर्माण होणे, ही संस्थेची परंपरा राहिली असून ज्या कर्मचाऱ्यांनी संस्थेत राहून मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यामुळेच संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रात नाव होत आहे. महाविद्यालयातील कर्मचारी हे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असले तरी ही त्यांची सेवानिवृत्ती नव्हे तर सामाजिक सेवेचा प्रारंभ असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भाजपचे लातूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले. कार्यालयीन अधीक्षक राजू ढगे यांचा सोमवारी (ता. ३०) रोजी नगर शिक्षण विकास मंडळाच्या वतीने माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सेवापुर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते राजू ढगे व मायाताई ढगे यांचा संपूर्ण आहेर उपचार करून सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बसवराज पाटील होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, बीडचे कार्यकारी अभियंता शरीफ पटेल, धनराज मंगरूळे, मदन पाटील, देवेंद्र कंटेकुरे, प्राचार्य उल्हास घुरघुरे, इरफान मुजावर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी चैतन्यमूर्ति माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी बसवराज पाटील म्हणाले की, वैजनाथराव ढगे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या चिरंजीवाला उत्कृष्ट शिक्षण, संस्कार दिले. त्यांनी माधवराव (काका) पाटील परिवाराचे ऋणानुबंध कायम ठेवत प्रामाणिक, निष्ठा व कष्टाच्या जोरावर काम करत राहिले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन काकांनी त्या काळात राजू ढगे यांना शिक्षण संस्थेत काम करण्याची संधी दिली. त्यांनी देखील चांगले विचार जोपासून या परिसरात आपली ओळख निर्माण केली. आज ते सेवानिवृत्त होत असून, त्यांनी पुढील काळातही समाजासाठी चांगले कार्य करत रहावे.सत्काराला उत्तर देताना ढगे म्हणाले की, या संस्थेने मला काम करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. विविध शाळेतील सहशिक्षक, सहकारी मित्र, नातेवाईक, शहरातील पदाधिकारी-कार्यकर्ते आदींनी त्यांचा सत्कार केला.

## कृषी पुरस्कार अर्ज ऑनलाईन सादर करणेस १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी व आवश्यक कागदपत्र जमा करणेसाठी होणारा त्रास व लागणारा खर्च यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण,पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर ( https://krishi.maharashtra.gov.in ) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांना सन 2025 करिता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेची अंतिम मुदत दि.31.03.2026 होती. परंतु online प्रणालीचे पहिलेच वर्ष तसेच शेतकऱ्यांना पुरस्कारासाठी आवश्यक असलेला जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून घेण्यास लागणारा कालावधी या कारणास्तव काही अर्ज शेतकरी स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे शेतकरी स्तरावरून व क्षेत्रीय स्तरावरून सदरची मुदत वाढवून मिळणेबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने सन 2025 करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेस कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.15 एप्रिल 2026 करण्यात येत आहे .तरी इच्छुक शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत अर्ज करणेबाबत आवाहन करणेत येत आहे .

## समृद्धी महामार्गालगत नागझरी नदीत अज्ञातांकडून केमिकल टाकल्याचा प्रकार; शेतकरी संतप्त





**दौलताबाद (जावेद अहमद) :** समृद्धी महामार्गाच्या नागपूर कॉरिडॉरवरील साखळी क्र. ४४३+२०० परिसरात असलेल्या नागझरी नदीत अज्ञात टँकरद्वारे धोकादायक केमिकल टाकले जात असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.दौलताबाद व माळीवाडा शिवारातील गट क्र. ८४ व गट नं. १८९ मधील शेतकरी संतोष गाणार आणि रावसाहेब शेरकर यांनी याबाबत दौलताबाद पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी अज्ञात टँकरमधून नदीत केमिकल सोडण्याचा प्रकार सुरू आहे.या केमिकलमुळे परिसरातील झाडे वाळू लागली असून नागझरी नदीतील पाणी मोठ्या प्रमाणात दूषित झाले आहे. काही ठिकाणी साचलेल्या पाण्यात केमिकल मिसळल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या विहिरीतही हे दूषित पाणी झिरपल्याने पाण्याला तीव्र दुर्गंधी येत असून ते पाणी पिण्यास अयोग्य ठरत आहे.महत्त्वाचे म्हणजे नागझरी नदी पुढे असेगाव तळेसमान गावातील मोठ्या तलावात मिळते. जर हे दूषित पाणी तलावात मिसळले, तर मोठा पर्यावरणीय व आरोग्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता असून, या प्रकरणात संबंधित अज्ञातांवर तात्काळ कारवाई करून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसानही होत आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकाराची दखल घेऊन पोलीस व संबंधित विभागांनी तातडीने तपास सुरू करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## प्रा. कृष्णा लांडगे यांना इंग्रजी विषयांमध्ये पीएच.डी. पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्रा कृष्णा भारतराव लांडगे ( विनायकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय, वैजापूर) यांना इंग्रजी विषयात नुकतीच पीएचडी जाहीर केले. श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ दादासाहेब साळुंके यांच्या मार्गदर्शनात "मायथॉलॉजिकल इंटरप्रिटेशन ऑफ आमिष त्रिपाठीज नॉव्हेल्स : अ क्रिटिकल स्टडी" या विषयावर शोधप्रबंध सादर केला त्यास विद्यापीठाने मान्यता दिली; याबद्दल सर्व सहकारी मित्र व आवडे उंचेगाव येथील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ मार्च २०२६


## खून झालेल्या'त्या' वृद्ध महिलेची ओळख पटविण्यासाठी २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर



**दौलताबाद (जावेद अहमद) :** माळीवाडा-आसेगाव मार्गावर आढळला होता मृतदेह दि २६ मार्च रोजी एक साठ वर्षीय अज्ञात महिलेचा शव मिळून आले होते उत्तरणीय तपासणी मध्ये अनेक जखमा आढळल्याने हा खुनाचा प्रकार असल्याचा निष्कर्ष डॉक्टरांनी नोंदविला. त्यावरून दि २७ रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला. गुन्हे शाखा आणि दौलताबाद पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेपोलिसांनी ओळख पटविण्याचे काम सुरू केले जंग जंग पछाळत बस स्थानके, रेल्वे स्टेशन आदी गर्दीच्या ठिकाणी सदर महिलेचे फोटो चे पोस्टर चिटकवले पण पण अजून पर्यंत खून झालेल्या महिले बाबत कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याने पोलीस उपायुक्त छत्रपती संभाजीनगर झोन क्र ०१ चे पंकज अतुलकर यांनी सदर महिलेची ओळख पटवण्यासाठी पंचवीस हजार रुपयांचे रोख बक्षीस पोलिसांच्या वतीने देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहेएआयच्या फोटोवरून तपास सुरू। पोलिसांनी वृद्धेची ओळख पटविण्यासाठी एआय तंत्रज्ञानाद्वारे फोटो तयार त्यावरून महिलेचा स्पष्ट, असा फोटो तयार केला असून व्हायरल करण्यात आला आहे. शिवाय, अंगात गुलाबी रंगाची साडी व ब्लाउज आहे.2 उजव्या हातात जपमाळ,उजव्या पायात काळा दोरा ,हातात हिरव्या रंगाची बांगड्या ,बोटात पितळी रिंग,गळ्यात काळ्या मण्याची पोत ,कानात डूल,ती वारकरी असल्याचे वर्णन वरून दिसते या वर्णनाच्या महिलेबाबत कोणालाही काहीही माहिती मिळाली तर पोलिसांनी संपर्क साधावा, असे आव्हान पोलिसांनी केले आहे

## मराठी भाषेच्या मूलभूत विकासासाठी परिषद महत्वाची भूमिका बजावेल -डॉ. वासुदेव मुलाटे



**कन्नड :** मराठी भाषा परिषदेच्या वतीने एक दिवशीय परिषदेचे आयोजन दि. ३१.मार्च २०२६ रोजी विवेकानंद महाविद्यालय येथे करण्यात आले होते. या परिषदेचे उदघाटन वृक्षारोपणला पाणी घालून डॉ.वासुदेव मुलाटे यांनी केले. या उदघाटनपर भाषणात ते म्हणाले मराठी भाषा परिषदेचे कार्य हे मराठी भाषेच्या विकासासाठी महत्वाचे आहे.या परिषदेने भाषा व साहित्याच्या इतिहासाचे संशोधन करावे.नियतकालिक चालवावे, मराठी भाषा परिषदेची स्थापना ही महत्वाची घटना आहे. असे ते म्हणाले. या परिषदेचे अध्यक्ष. डॉ. सर्जेराव जिगे हे होते. या वेळी ते म्हणाले मराठी भाषेचा विकास करण्यासाठी सर्वांचे सहकार्य घेतले जाईल. या परिषदेमध्ये कोणताही व्यक्ती वंचित राहणार नाही तर सर्वांना सामावून घेतले जाईल. यावेळी त्यांनी धाराशिव, बीड, जालना, संभाजीनगर जिल्ह्याची कार्य कारणी जाहीर केल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक. डॉ. मोहन सौंदर्य यांनी केले. सूत्रसंचालन डॉ सहदेव रसाळ यांनी केले तर आभार डॉ दिलीप बिरूटे यांनी व्यक्त केले या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. युवराज धबडगे, डॉ. शिवाजी हुसे, डॉ नवनाथ गोरे, डॉ. सुधाकर जाधव, डॉ. यशवंत सोनुने, डॉ. उमेश मुंढे, डॉ. मनोहर शिरसाट, डॉ. अनिल गर्जे, डॉ. सोपान सुरवसे, डॉ. राजाराम सोनटक्के,डॉ. राम रौणेकर, डॉ. पंडित राणमाळ, डॉ. कैलास इंगळे, डॉ. गोवर्धन मुळक, डॉ. सुभाष बागल, डॉ. अनिता खंडागळे,डॉ. अर्चना काटकर, डॉ. रेखा वाघ, डॉ वंदना पाटील,यांनी केले. यावेळी वेगवेगळ्या जिल्ह्यातील प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

## गंध मातीचा अजुन

गंध मातीचा अजुन
काळजात रुजलेला
माझ्या प्रत्येक श्वासात
गाव सारा सजलेला

आठवांच्या झोक्यावर
उभा जीव टांगलेला
मागं वळून पाहता
डाव सारा हरलेला

माय माउलीची हाक
वारा सांगतो कानात
माय उंबऱ्यात उभी
गोड हसते स्वप्नात

बाप राबला खपला
उन्हामधी जिंदगाणी
तेव्हा उगवून आली
मातीतून गोड गाणी

ओलसर मातीमध्ये
हात पाय भिजलेले
बालपणीचे दिवस
सावलीत माखलेले

गेले सोनेरी ते क्षण
निसटुन कायमचे
रितं जगणं घेऊन
आता पुढे चालायचे

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

## आयुष्यातले रंग

जीवनात जगतांना,
सतत संघर्ष करावे.
संघर्ष करता करता,
सदा सप्तरंग भरावे.
आयुष्यातले रंग सदा,
आनंदाने तू उधळावे.
जीवनात दुःख येताच,
संघर्ष करून पळवावे.

लाल पिवळा हिरवा,
उधळत जावे सर्व रंग.
रंगांच्या दुनियेत रंगुनी,
करू नये स्वप्नांचे भंग.

प्रत्येक रंग सांगत
असतो,
आनंदाने जगण्याचे
मर्म.
यशस्वी व्हायचे असेल
तर,
करत रहा सातत्याने
कर्म.

सर्व रंगात रंगून
जातांना,
बेधुंद होऊन नाचत
रहावे.
जीवनात यशस्वी
होतांना,
दिलेल्या संधीचे सोने
करावे.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**
9763283704






## इकरा पब्लिक स्कूलच्या इश्तियाक अहमद यांचे 'सीटीईटी' परीक्षेत यश



**जळगाव :** येथील नामांकित शैक्षणिक संस्था इकरा एज्युकेशन सोसायटी द्वारा संचलित इकरा पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे कल्पक आणि आश्वासक शिक्षक श्री.इश्तियाक अहमद यांनी केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेत (CTET) घवघवीत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता आणि शिक्षकांची व्यावसायिक पात्रता सिद्ध करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे घेतली जाणारी ही एक अत्यंत महत्त्वाची आणि अनिवार्य परीक्षा मानली जाते.इश्तियाक अहमद यांनी आपल्या सातत्यपूर्ण परिश्रमांच्या जोरावर या परीक्षेत यश मिळवून आपली अध्यापन क्षेत्रातील कुशलता सिद्ध केली आहे.त्यांच्या या यशाबद्दल इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. करीम सालार, प्राचार्य शेख शकील आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे. "इश्तियाक अहमद यांच्यासारख्या अभ्यासू आणि मेहनती शिक्षकांमुळे शाळेच्या शैक्षणिक दर्जात निश्चितच मोठी भर पडते," अशा शब्दांत प्राचार्य शेख शकील यांनी त्यांचा गौरव केला. या यशामुळे संपूर्ण इकरा परिवारात आनंदाचे वातावरण असून, सर्व स्तरांतून इश्तियाक अहमद यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ मार्च २०२६


## देवगिरी किल्ला हा जागतिक वारसा हे भारताचे वैभव आहे - टिकाराम शर्मा, राज्य माहिती आयुक्त



**दौलताबाद (जावेद अहमद) :** जगप्रसिद्ध असलेल्या दौलताबाद येथील देवगिरी किल्ल्यास फरीदाबाद येथील अतिरिक्त मनपा आयुक्त श्रीमती सलोना शर्मा व सहाय्यक राज्य माहिती आयुक्त राजस्थानचे टिकाराम शर्मा यांनी सपत्नीक देवगिरी किल्ल्यास भेट देऊन देवगिरी किल्ल्याची संरक्षण व्यवस्था आणि देवगिरीचा ऐतिहासिक वारसा समजून घेतला.यावेळी त्यांना दौलताबाद येथील, महाराष्ट्र पर्यटन विभागाचे अधिकृत पर्यटन मार्गदर्शक शेख जावेद यांनी पर्यटन मार्गदर्शन केले. किल्ला पहातेवेळी त्यांनी हा किल्ला जागतिक पर्यटन किल्ल्याच्या यादीत यायला हवा आणि येथील वैभव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचायला हवं अशी व्यवस्था येथील पर्यटन व्यवस्थेने करायला हवी असे प्रतिपादन केले.देवगिरी किल्ला हा जगातील अजिक्य किल्ल्यापैकी एक असून याची माहिती व प्रचिती या ठिकाणी आल्यावरच मिळते असेही त्यांनी नोंदवही मध्ये नोंद करताना म्हटले कुठलाही डाम डौल अथवा सुरक्षा न घेता स्वच्छंदपणे त्यांनी या किल्ल्याची बारकाईने माहिती घेतली येथील किल्ल्याची संरक्षण भिंत चांदमिनार व येथील परिसरातील तोफा आणि खंदक याची व अंधारी मार्गाची माहिती घेतली त्यांच्या मनात असलेली उत्सुकता कुतूहल पाहून हा किल्ला अद्भुत आहे इथला परिसर आणि या किल्ल्याचा इतिहास असे शब्द व्यक्त केले.

## जिल्हा बँकेचे रोकड अधिकारी सुनील निकम यांना सेवा निवृत्त निरोप



**दौलताबाद (जावेद अहमद) :** (औरंगाबाद जिल्हा बँक) दौलताबाद शाखेचे रोकड अधिकारी सुनील निकम सेवा मर्यादेनुसार आपल्या जीवनातील ३३ प्रदीर्घ काळ सेवा करून दि ३१ मार्च मंगळवारी बँकेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले दौलताबाद शाखा येथे त्यांना मान सन्मान देऊन त्यांना दि ३१ मंगळवारी त्यांना निरोप देण्यात आलायावेळी दौलताबाद जिल्हा बँक शाखेचे व्यवस्थापक सचिन झुरळे,एम डी रामटेके क्लार्क,एस के औटे, जिल्हा महामंत्री अल्पसंख्याक शेख बने, विलास जाधव, कृष्णा रोकडे,गणेश रोकडे, हरसिंग पुसे,सलमान शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती


### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


## आज पासुन ऑनलाईन व्यवहारात या गोष्टी बदलणार

केंद्रीय सरकारने म्हणजेच मोदी सरकारने ऑनलाईन पेमेंट पध्दतीत आरबीआयच्या सहमतीने केलेले नविन नियम,,, कृपया नोंद घ्यावी आणि लक्षात ठेवा - १ एप्रिल २०२६ पासून ऑनलाइन पेमेंटचे नियम बदलणार आहेत.मित्रांनो,१ एप्रिल २०२६ पासून, ऑनलाइन पेमेंट करण्याची पद्धत बदलेल; OTP (वन-टाइम पासवर्ड) वापरण्याची पद्धत बदलेल; आणि तुमचे बँक खाते सुरक्षित ठेवण्याची पद्धतही पूर्णपणे बदलणार आहे...१) १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारा पहिला नियम म्हणजे 'डायनॅमिक टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन' (Dynamic Two-Factor Authentication).- याचा अर्थ असा की, आता तुमच्या प्रत्येक पेमेंटची पडताळणी केली जाईल, म्हणजेच ते पेमेंट नक्की कुठून केले जात आहे हे तपासले जाईल.२) दुसरा नियम असा आहे की, तुम्ही बँकिंग ॲपमध्ये असताना स्क्रीनशॉट किंवा स्क्रीन रेकॉर्डिंग करू शकणार नाही. यावर पूर्णपणे बंदी असेल.- हे पाऊल यासाठी उचलण्यात आले आहे की, फसवणूक करणारे (scammers) 'AnyDesk' सारख्या ॲप्सद्वारे तुमच्या स्क्रीनचे रेकॉर्डिंग करतात. त्यातून त्यांना तुमचा OTP आणि पासवर्ड मिळतो, आणि त्यानंतर ते तुमच्या मोबाइलचा ताबा घेऊन तुमच्या खात्यातून पैसे काढून घेतात.३) तिसरा नियम असा आहे की, तुम्ही रात्रीच्या वेळी होणारे व्यवहार (transactions) 'लॉक' (बंद) करून ठेवू शकता. याचा अर्थ असा की, बँकांनी त्यांच्या ॲपमध्ये अशी सुविधा उपलब्ध करून दिली आहे की, तुम्हाला हवे असल्यास तुम्ही रात्री ११ वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत तुमचे आर्थिक व्यवहार लॉक करून ठेवू शकता.- या कालावधीत, तुमच्या खात्यातून कोणीही एक रुपयाही काढू शकणार नाही.४) चौथा नियम असा आहे की, तुम्ही एखादे फसवणूक करणारे ॲप (fraudulent app) किंवा 'मालवेअर' (malware) डाउनलोड करताच, तुम्हाला त्याबाबतची चेतावणी (warning) दिली जाईल.५) पाचवा नियम असा आहे की, OTP प्रणालीमध्ये (system) एक मोठा बदल होणार आहे.- याचा अर्थ असा की, SMS द्वारे OTP मिळण्याची पद्धत बंद केली जाईल. यापुढे तुम्हाला OTP हा तुम्ही वापरत असलेल्या संबंधित ॲप्लिकेशनमध्ये किंवा बँकिंग ॲपमध्येच मिळेल.६) सहावा नियम असा आहे की, प्रत्येक व्यवहाराच्या वेळी तुम्हाला काही अतिरिक्त प्रश्न विचारले जाऊ शकतात.- उदाहरणार्थ, समजा तुम्ही २००० रुपयांचा एखादा व्यवहार केला आहे, आणि अचानक तुमच्या खात्यातून ५०,००० रुपये, १,००,००० रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम काढली गेली, तर तुम्हाला काही सुरक्षा प्रश्न (security questions) विचारले जातील. उदा. तुमच्या आईचे नाव काय आहे? तुम्ही कोणत्या शाळेत शिक्षण घेतले आहे? किंवा तुम्ही सेट केलेले इतर कोणतेही सुरक्षा प्रश्न विचारले जाऊ शकतात. जर तुम्ही त्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिली, तर तो व्यवहार तुम्हीच करत आहात असे मानले जाईल. अन्यथा, बँकेला तशी सूचना (notification) मिळेल की, तिथे कदाचित फसवणूक करणारे सक्रिय असू शकतात.७) सातवा नियम म्हणजे 'बिहेवियरल बायोमेट्रिक्स' (Behavioural Biometrics). - याचा अर्थ असा की, तुम्ही ज्या पद्धतीने टाईप करता, तुमच्या टाईप करण्याचा वेग आणि तुम्ही तुमच्या स्क्रीनचा वापर कसा करता—या बाबींवरून तुमची बँकिंग ॲप्लिकेशन तुम्हीच ती वापरत आहात की नाही, याची खात्री करेल.8) आठवा आणि अंतिम नियम म्हणजे 'आधार' (Aadhaar) आणि 'बायोमेट्रिक्स'.- जर तुम्ही बँकिंग ॲपद्वारे एखादा मोठा आर्थिक व्यवहार करत असाल—उदा. ५,००,००० रुपये, ८,००,००० रुपये किंवा १०,००,००० रुपये—तर अशा वेळी तुमच्या आधारची जोडणी (लिंकिंग), तुमची बोटांची ठसे (फिंगरप्रिंट) किंवा तुमचा चेहरा स्कॅन (फेस स्कॅन) करण्याची मागणी केली जाईल.- या प्रक्रियेविना, तुम्ही कोणताही आर्थिक व्यवहार किंवा पेमेंट करू शकणार नाही. मित्रांनो, ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवा आणि शेअर करा.स्वतः जागरूक व्हा आणि इतरांनाही जागरूक करा....*'डिजिटल अटक' (Digital Arrests) आणि बँकिंग फसवणूक करणाऱ्यांपासून सावध करण्याची सुधारित व्यवस्था....

**प्रा. सुधीर पंचगल्ले**
श्री माधवराव पाटील
महाविद्यालय,
मुरुम ता. उमरगा




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ मार्च २०२६

# भारतातील श्रद्धा, बुवाबाजी आणि बुद्धिप्रामाण्यवादाला सुरुंग




**ब**लात्काराचा दोषी असलेला आसाराम बापू आणि हत्या व बलात्काराचा दोषी असलेला गुरमीत राम रहीम सिंग इन्सान यांना पॅरोल मिळाल्याच्या बातम्या आपण नियमितपणे वाचतो. हे दोन बाबा सध्याचे एक अग्रगण्य 'ब्रँड' आहेत, ज्यांच्याकडे अफाट संपत्ती, आश्रमांचे जाळे आणि त्यांच्यासाठी काहीही करण्यास तयार असलेल्या श्रद्धाळूंची मोठी संख्या आहे. हे फसवणूक करणाऱ्यांच्या टोळीतील दोन अत्यंत सुप्रसिद्ध चेहरे आहेत, जे पवित्रतेचा बुरखा पांघरतात आणि अत्यंत नीच कृत्ये करतात. गेल्या काही दशकांमध्ये या गेल्या काही दशकांमध्ये बाबांची संख्या वाढलेली दिसते. यात शंका नाही की, त्यांच्यासारख्याच इतर अनेकांनी वेगवेगळ्या मार्गांनी स्वतःचा विस्तार केला आहे आणि संपत्ती व भक्तांची आपली साम्राज्ये प्रस्थापित केली आहेत. वास्तविक पाहता, आपण जे पाहत आहोत ते समाजात वाढत्या असुरक्षिततेवर फोफावणाऱ्या 'श्रद्धा-अंधश्रद्धा' साम्राज्यांचे केवळ हिमनगाचे टोक आहे. एप्स्टीनसारखे लोक इतर यंत्रणांद्वारे या समाजात (अशा कृत्यांत) मग्न असताना, भारतात आपण जे पाहतो त्यांची मुळे अंधश्रद्धेत घट्ट रुजलेली आहेत, ज्याचा वापर ते मोठ्या हुशारीने संपत्ती आणि स्त्रियांसाठी लोकांचे शोषण करण्यासाठी करतात.

महाराष्ट्रातील नाशिकमध्ये नुकतेच असेच एक प्रकरण समोर आले आहे. येथे अशोक खरात नावाच्या व्यक्तीला त्याच्या श्रद्धेच्या/आस्थेच्या फसव्या वापरामुळे पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सर्व बड्या आणि सामर्थ्यवान व्यक्तींनी त्याला भेटी दिल्या होत्या आणि त्याच्या भक्तांपैकी एक महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आहेत, ज्यांचा या भामट्यासोबतचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यात त्या त्याचे पाय धुताना आणि उन्हापासून त्याचे रक्षण करण्यासाठी छत्री धरताना दिसत आहेत. आपण मर्चंट नेव्हीचे माजी कॅप्टन असल्याचा दावा खरातने केला होता, त्याला दैवी शक्ती प्राप्त आहेत आणि तो ज्योतिषी व अंकशास्त्रज्ञ असल्याची भूमिका वठवत होता. मंत्री आणि उच्चपदस्थ लोक त्याच्याकडे येत असत. तो चिंचेच्या पॉलिश केलेल्या बिया मौल्यवान रत्ने म्हणून विकण्याव्यतिरिक्त पैसे कमावण्याचे इतरही अनेक उद्योग करत असे. सुरुवातीला ज्या अनेक महिलांना त्याच्या अत्याचाराचा सामना करावा लागला, त्या गप्प राहिल्या कारण त्याचे उच्चपदस्थांशी असलेले संबंध खूप घट्ट होते.

प्रतिष्ठेचे स्थान दिलेल्या गेलेल्या आणि फोफावणाऱ्या बुवाबाजीच्या संख्येत झालेली ही आणखी एक संतापजनक भर आहे. आपल्याकडे सुरुवातीला चंद्रास्वामी, धीरेंद्र ब्रह्मचारी, आचार्य रजनीश, महेश योगी यांच्यापासून सुरुवात झाली होती, ज्यांचे समाजाच्या राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात मोठे वर्चस्व होते. याच दरम्यान सत्य साईबाबांच्या उदयाने देखील आपल्या बोटांच्या हालचालीतून राख निर्माण करण्याच्या जादुई क्लृप्त्यांनी वातावरण व्यापले होते. त्यांची दैवी शक्ती केवळ राख आणि छोट्या अंगठ्या निर्माण करण्यापुरती मर्यादित होती आणि त्यांनी या युक्तीने कलिंगड निर्माण करण्यास नकार दिला होता. त्यांच्या बाबतीतही लैंगिक शोषणाची प्रकरणे समोर आली होती. 'किसिंग अम्मा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माता अमृतानंदमयी या देखील अशाच एक दैवी शक्ती राहिल्या आहेत. निर्मल बाबा, बेनी हिन्न आणि अनेक बंगाली बाबा देखील रस्त्या-रस्त्यांवर सर्वांच्या समस्या सोडवण्याचा दावा करत फिरत असतात.

सध्या अग्रस्थानी जग्गी वासुदेव आणि बाबा रामदेव यांच्यासारखे दिग्गज आहेत. वासुदेव यांनी 'इनर इंजिनिअरिंग' (Inner Engineering) हा चमत्कारिक शब्द तयार केला आहे आणि आयटी (IT) पिढीमध्येही त्यांचे अनुयायी आहेत. श्री श्री रविशंकर यांचा अण्णा आंदोलनाला प्रोत्साहन देऊन आणि विशेषतः यमुना नदीच्या आसपासच्या पर्यावरणास मोठी हानी पोहोचवणाऱ्या महोत्सवाचे आयोजन करून स्वतःचा असा वेगळा राजकीय प्रभाव निर्माण केला आहे. ही यादी मोठी आणि कधीही न संपणारी आहे. परंतु आपण बाबा रामदेव यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही, ज्यांनी योग प्रचारक म्हणून सुरुवात केली आणि पुढे एक अत्यंत यशस्वी उद्योगपती बनले. त्यांनी आश्वासन दिले होते की जर आपण नरेंद्र मोदींना पंतप्रधान म्हणून निवडून दिले, तर पेट्रोल स्वस्त (३५ रुपये प्रति लिटर) होईल आणि रुपया डॉलरच्या तुलनेत अधिक मजबूत होईल.

हे स्पष्टपणे दिसून येते की, समाजात जशी आर्थिक असुरक्षितता आणि विषमता वाढत आहे, तसाच श्रद्धा-आधारित गुरूंचा प्रभाव गगनाला भिडत आहे. यासोबतच समाजात श्रद्धा-आधारित ज्ञानाचाही उदय होत आहे. कोणालाही आठवेल की, पौराणिक कथांचा वापर करून विवेकबुद्धीला /तर्कशुद्ध विचारांना सुरुंग लावणे हे केवळ भारतापुरते मर्यादित नाही. मला आठवते की, पाकिस्तानमधील एका बैठकीत पौराणिक 'जिन्नात' (भुतांवरील) संशोधनाचा उपयोग पाकिस्तानमधील ऊर्जेची टंचाई दूर करण्याचा उपाय म्हणून सादर करण्यात आला होता! भारताकडे विज्ञान आणि तर्कसंगत विचारांचा खूप चांगला पाया होता, ज्यामुळे उत्कृष्ट संस्थांची एक साखळी निर्माण झाली आणि त्यांनी भारताच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले, परंतु गेल्या काही दशकांतील कल अत्यंत निराशाजनक आहेत.

स्वतः पंतप्रधानांनी एका आधुनिक रुग्णालयाचे उद्घाटन करताना 'विज्ञान म्हणून पौराणिक कथा' असा पाया रचला, जेव्हा त्यांनी विधान केले की प्राचीन भारतात नक्कीच एखादा प्लास्टिक सर्जन असावा ज्याने मानवी धडावर हत्तीचे शिर प्रत्यारोपित केले असेल. ग्रहांच्या दरम्यान प्रवास करण्यास सक्षम असलेल्या 'पुष्पक विमाना'सारख्या अनेक सुखद पौराणिक कथा आधीपासूनच अस्तित्वात होत्या. मोदींच्या गटातील नेत्यांच्या एका संपूर्ण मालिकेने असा दावा करण्यास सुरुवात केली की, सर्व जनुकीय विज्ञान, अंतराळयान आणि इंटरनेट आपल्या परंपरांमध्येच अस्तित्वात आहेत!

या सर्वांवर कळस म्हणजे, पौराणिक कथांना गांभीर्याने घेतले जात आहे आणि रामायण व महाभारतावरील संशोधनासाठी मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवला जात आहे. ज्या देशाला कुपोषण आणि संसर्गजन्य रोगांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे, तो देश 'पंचगव्य' - गायीची उत्पादने, मूत्र, शेण, दूध, तूप आणि दही यांचे मिश्रण - यावर संशोधन करण्यासाठी गुंतवणूक करत आहे! श्रद्धा-आधारित समजुतीला प्रोत्साहन दिले जात आहे, कारण पंतप्रधान बागेश्वर धाम बाबांना आपला धाकटा भाऊ मानतात, जो व्यक्तीचा भूतकाळ सांगण्याच्या गूढ शक्तींचा दावा करतो, नवीन पिढीवर 'भारतीय ज्ञान प्रणाली' (IKS) बिंबवली जात आहे. भारताने निश्चितच तर्कशुद्ध विचारांमध्ये मोठे योगदान दिले आहे, परंतु त्यातील सत्य आणि असत्य वेगळे करणे आवश्यक आहे.

हे सर्व लक्षात घेता, डार्विनचा 'उत्क्रांतीवादाचा सिद्धांत' देखील टाकून दिला आहे आणि रसायनशास्त्राचा पाया असलेली 'आवर्त सारणी' (Periodic Table) नवीन शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आली आहे. इतिहासात आपल्याला दिसून येते की, श्रद्धा-आधारित ज्ञान हे यथास्थिती (Status quo) प्रोत्साहन देतात किंवा समाजाला अशा जुन्या काळात ढकलतात जेव्हा तर्कसंगत विचार इतका प्रबळ नव्हता. हे सर्व लक्षात घेता, डार्विनचा 'प्रजातींच्या उत्क्रांतीचा सिद्धांत' सुद्धा फेटाळला गेला आहे आणि रसायनशास्त्राचा पाया असलेली आवर्त सारणी नवीन शिक्षण धोरणाच्या अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आली आहे.

भारतीय संविधानाच्या कलम ५१ अ (एच) (१९७६ मध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे समाविष्ट) नुसार, प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि जिज्ञासा व सुधारणेची भावना विकसित करणे हे एक मूलभूत कर्तव्य आहे. हे कलम अंधश्रद्धेवर मात करण्यासाठी आणि सामाजिक प्रगतीला चालना देण्यासाठी जीवनाकडे पाहण्याच्या तर्कशुद्ध, पुराव्यावर आधारित दृष्टिकोनाला प्रोत्साहन देते. आपली सध्याची दिशा याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे, जिथे सत्ताधारी पक्ष नवीन शिक्षण धोरणातील बदलांच्या नावाखाली अंधश्रद्धेचा आधार घेत आहे आणि त्याला प्रोत्साहन देत आहे. हे येणाऱ्या पिढ्यांसाठी अत्यंत हानिकारक ठरेल आणि खरात, बागेश्वर धाम बाबांसारख्या व्यक्तींना मोठे यश मिळेल. डॉ. दाभोळकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांच्यासारख्या व्यक्तींना आपल्या प्राणांची आहुती देऊन तर्कशुद्ध विचारांसाठी आपले प्रबोधनात्मक कार्य करणे कठीण जाईल. डॉ. राम पुनियानी हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई येथे प्राध्यापक होते आणि भारतातील जातीय सलोख्यासाठी पूर्णवेळ काम करण्याकरिता त्यांनी डिसेंबर २००४ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली.

**मराठी भाषांतर : प्रा. प्रियदर्शन भवरे, जालना**
**आभार : काउंटर करंट, २६/०३/२०२६**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002